# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना** :- धरमपेठ झोन क्र. 2 अंतर्गत सेवासदन शाळेच्या मागे सॅन्ड बॅग
**{सा.बां.वि. झोन क्र. ०२}** ठेवणे तसेच फुटाळा, कॅनल रोड, व न्युरॉन हॉस्पीटल जवळ टिनाचे बॅरीगेटींग करण्याच्या कामास रु.24,90,752/- चे प्राकलनास कार्योत्तर प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या तसेच पद क्र. A28801332203 अंतर्गत तरतुद मुक्त करुन सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5.2.2 अन्वये हे काम नागरीकांच्या सुरक्षात्मक उपाययोजना म्हणुन अत्यंत तातडीने व ठराविक विशिष्ठ वेळेमध्ये व त्वरीत करावयाचे असल्याने म.न.पा. पंजीबंध्द कंत्राटदार मे. संदिप के. चरडे यांना प्राकलनीय दरावर कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करण्यास्तव मा. आयुक्त तथा प्रशासक यांची कार्योत्तर प्रशासकीय मंजुरी प्रदान केलेली असुन याची नोंद करुन मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप** :-

1. सदर्हु कामाला कार्यकारी अभियंता यांच्याद्वारे तांत्रिक मान्यता क्र. EE/PWD/T.S/32/2025-26 दिनांक 08/08/2025 नुसार तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.
2. प्रस्तुत कामाकरीता सन 2025-26 चे आय व्ययकातील पद क्र. A28801332203 अंतर्गत खर्च प्रस्तावित आहे.
3. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 293/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 19/09/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धरमपेठ झोन क्र. ०२ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार धरमपेठ झोन क्र. 2 अंतर्गत सेवासदन शाळेच्या मागे सॅन्ड बॅग ठेवणे तसेच फुटाळा, कॅनल रोड, व न्युरॉन हॉस्पीटल जवळ टिनाचे बॅरीगेटींग करण्याच्या कामास रु.24,90,752/- चे प्राकलनास कार्योत्तर प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या तसेच पद क्र. A28801332203 अंतर्गत तरतुद मुक्त करुन सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5.2.2 अन्वये हे काम नागरीकांच्या सुरक्षात्मक उपाययोजना म्हणुन अत्यंत तातडीने व ठराविक विशिष्ठ वेळेमध्ये व त्वरीत करावयाचे असल्याने म.न.पा. पंजीबंध्द कंत्राटदार मे. संदिप के. चरडे यांना प्राकलनीय दरावर कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करण्यास्तव मा. आयुक्त तथा प्रशासक यांची कार्योत्तर प्रशासकीय मंजुरी प्रदान केलेली असुन याची नोंद करुन मंजुरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केल.